कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला
ई-मेल: directorcrs78@gmail.com

जा.क्र.मसंकें/सामान्य/588 /२०२५ दि. 09/07 /२०२५

# निविदा/कोटेशन सूचना

**विषय:- मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत विविध विभागावर ड्रोन यंत्राने फवारणी करिता निविदा दर मागविणेबाबत.....**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत विविध विभागावर ड्रोन यंत्राने फवारणी करिता दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा/कोटेशन मसुदा सोबत जोडलेला आहे.

**अटी व शर्ती**

१. फवारणीचा तपशील सलग्न केलेल्या कोटेशन/निविदा मसुदा मध्ये दिलेला आहे.
२. मसुदामधे नमूद तपशिलानुसार कोटेशन सादर केल्यास कोटेशन विचारात घेण्यात येईल.
३. निविदा मसुदा मध्ये नमूद केल्याप्रमाणे दर नमूद करावे तसेच दर सर्व करासह (जीएसटीव इतर करासह) नमूद करावे.
४. कोटेशन/निविदा संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला याचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी व लिफाफ्यावर "**ड्रोन यंत्राने फवारणीकरिता**" नमूद केलेले असावे.
५. कोटेशन/निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील.
६. कोटेशन/निविदा मध्ये दर्शविण्यात आलेले दर हे ३१ मार्च २०२५ महिन्याकरिता वैध राहतील.
७. कोटेशन/निविदा उघडल्या नंतर कमीत कमी दर नमूद केलेल्या निविदाधारकास फवारणी करण्यात येतील.
८. नेमून दिलेले काम पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत काही तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
९. मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत विविध विभागावरुन तपशिलानुसार फवारणी करण्याची जबाबदारी कमीत कमी दर नमूद केलेल्या निविदाधारकाची राहील.
१०. निविदाधारक/कंत्राटदारास देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल..
११. तपशिलानुसार विभागावर फवारणी करत असताना कोणत्याही प्रकारची जिवित हानी झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहील.
१२. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारकांना बंधनकारक राहील.

१३. उपरोक्त करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राही

१४. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिलानुसार दि. **१७.०७.२०२५** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

१५. प्राप्त निविदा दि. **१८.०७.२०२५** रोजी दुपारी **०४.००** वा. उघडण्यात येतील याची नोंद घ्यावी.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंदेकृवि, अकोला

Inward No. 206
Dt. 10/7/25

# <u>निविदा/कोटेशन मसुदा</u>

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत **विविध विभागावर ड्रोन यंत्राने फवारणीचे** दर खालील प्रमाणे आहेत

| अ. क्र. | कामाचा तपशील | दर (रु) |
|---|---|---|
| १ | तणनाशक,बुरशीनाशक, व किटकनाशक फवारणी | प्रति हेक्टर |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण पत्ता